# सेवक वार्ता

जुलै - २०२४

वर्ष -५ अंक- ९


**सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र**

## सेवकच्या शिरपेचामध्ये आणखी एक तुरा

### , वन्यजीव शमन व संवर्धन उपाय योजना तयार आराखड्यास केंद्र सरकारची तत्वत: मान्यता प्राप्ती

मध्य रेल्वेच्या मुख्य अभियंता बांधकाम, संचालक वन अकादमी चंद्रपूर यांचे प्रस्तावाप्रमाणे तानसा अभयारणतून जाण-या कसारा-कल्याण या तिस-या रेल्वे मार्गाच्या उभारणी प्रकल्पांस वन्यजीव शमन व संवर्धन उपाय योजनेच्या आराखड्याचे काम सेवक चमूने श्री. विश्वास सावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. त्यास केंद्र सरकारच्या प.व.व ज. प. मंत्रालयाच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयाच्या दि.१९-७-२०१४ च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्राप्त झाली आहे. यासाठी श्री. व्ही.टी. पत्की यांचे प्रभावी समन्वयनाचा सिहांचा वाटा होता.





भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
पर्यावरण, वन एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय
MINISTRY OF ENVIRONMENT, FORESTS & CLIMATE CHANGE
Regional Office, Ground Floor, East Wing,
New Secretariat Building Civil Lines, Nagpur – 440001.

F.No. FC-MH-219/2023-NGP/ 13374 Date: 19.07.2024

To,
The Principal Secretary (Forests),
Revenue and Forest Department,
Hutatma Rajguru Chowk
Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai– 400032.

Sub: Diversion of 16.6846 ha of forest land in favour of Central Railway, Ghatkopar for construction of third Railway line between Kalyan to Kasara station of 67.62 km in Ulhasnagar, Kalyan and ShahapurTalukas in Thane District in the State of Maharashtra- regarding.

Sir,

The undersigned is directed to refer to the Government of Maharashtra's letter no. FLD-1923/CR.20/F-10 dated 25.05.2023 and APCCF & Nodal Officer (FCA), Maharashtra Letter No. Desk-17/Nodal/Thane/ID-13361(78)/2430/2022-23 dated 19.12.202 on the above subject seeking prior approval of the Central Government under Section-2 of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980.

After careful consideration of the proposal and with the approval of the Regional Empowered Committee (REC), I am directed to convey the Central Government's *in-principle* approval under Section '2' of Van (Sanrakshan Evam Samvardhan) Adhiniyam, 1980 for diversion of 16.6846 ha of forest land in favour of Central Railway, Ghatkopar for construction of third Railway line between Kalyan ...

## सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा

कल्याण-कसारा तिसऱ्या रेल्वे मार्गासाठीच्या मंजुरीनंतर सेवकला सोलापूर-उस्मानाबादचा प्रकल्पासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन योजना तयार करण्यासाठी संधी मिळण्याच्या आशा व्दिगुणित झाल्या होत्या त्या प्रत्यक्षात येत आहेत.

चंद्रपूर वन प्रबोधिनीने नवीन सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा तयार करण्याचे काम स्वीकारण्याची तयारी दर्शवली आहे, आणि प्रकल्पासाठी खर्चाचा अंदाज पाठवण्याची सूचना केली आहे.

या कामासाठी सेवकचे खालील सदस्यांची टीम स्थापन करण्याचे ठरविले आहे.

१. व्ही. बी.सावरकर- चमू प्रमुख
२. अजय पिलारीसेट- चमू उप प्रमुख
३. सुभाष बडवे - सदस्य
४. एस. व्ही. कुंभकर्ण- सदस्य
५. डॉ. संतोष यादव - वर्गीकरण शास्त्रज्ञ.
६. पी. बी. धानके- सह- वर्गीकरण शास्त्रज्ञ.
७. व्ही. टी. पत्की - समन्वयक.

श्री. पत्की चमू प्रमुखांशी सल्लामसलत करून खर्चाचा अंदाज तयार करतील आणि त्यांच्या मंजुरीबद्दल माहिती देतील.

## *नवी आव्हाने*

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम... प्रगतीचा आढावा

दि. १० जुलै २४ रोजी दुपारी १०:०० वाजता मा. APCCF (RET) यांचे अध्यक्षतेखाली वनरक्षकाचे पायाभूत प्रशिक्षणाकरीता वाचन साहित्याचे पुनर्विलोकन करणेबाबत सभा झाली. सभेकरिता **पुस्तकांचे व** उपस्थित होते. चंद्रमाचे संचालक यांनी सर्व सेवक साहित्य लेखक (गट क्र.१,२,३ विषय), नियुक्त गट प्रमुख **व** उपस्थित होते .

या बैठकीत प्रामुख्याने अभ्यासक्रम,निर्माण केलेले सुधारीत साहित्य यांचा आढावा, गट प्रमुखांचे सूचनांची पूर्ती इत्यादी विषयांवर चर्चा झाली. साहित्यात ,अभ्यासक्रमातील सर्व बाबी समाविष्ट आहेत किंवा नाही/ तपासणी करणा-या समिती सदस्य व लेखक यांनी समोरासमोर बसून वाचन साहित्य अंतिम करण्याची कारवाई जुलै-२४ अखेरकरावयाची आहे.

## वेधक वृत्त

### सेवक संघ संदेश चालतो पंढरीची वाट! चाळीसगावकरांचा असे अजब थाट ॥

चाळीसगाव येथील सेवानिवृत्त वन कर्मचारी संघाचे सदस्यव्दय, कार्यकर्ते व उपाध्यक्ष श्री. जी. के निकम व बाजीराव छल्लारे यांनी यंदा पंढरीच्या वारीस जाताना अभिनव उपक्रम राबवत वृक्ष संवर्धनाचा संदेश थेट पंढरीच्या विठुरायाच्या पायापर्यंत पोहोचवला आहे. त्यातून एक वेगळे

समाज कार्य करण्याच्या कृतीचा आदर्श त्यांनी इतर वारकऱ्यांसमोर ठेवून सेवक संघाचे नाव व कार्य सर्व दूर पसरवण्यास हातभार लावला. त्यांचे केंद्रीय कार्यकारीणीकडून कौतुक करत रू. २०००० रक्कम भेट देणयाचानिर्णय जाहीर झाला. त्यांचे अभिनंदन. विठ्ठल रखुमाईची त्यांच्यावर सतत कृपा राहो ही प्रभू चरणी प्रार्थना.








प्रासंगिक...

सेवक संघ, धुळे शाखेच्या सदस्यांच्या वृक्ष संवर्धन संदेशाच्या पंढरपूर वारीची त्यांच्याच शब्दातील डायरी

ओम पंढरीनाथय नमः।

रुख्मिणीमाताय नमः ।।

## पायी वृक्षदिडी चाळीसगांव ते पंढरपूर

श्री. ज्ञानेश्वर हरी कुमावत (लहान गाऊली) बेलदारवाडी यांचे सोबत श्री. ह.भ.प महादु बाबा, घाट रोड, चाळीसगांव यांच्या रथासोबत १) श्री बाळकृष्ण रामचंद्र छल्लारे, वय ६८ वर्षे, सेवानिवृत्त बनपाल व आजीवन सदस्य सेवानिवृत वन कर्मधारी संघ, पुणे लगत शाखा मुळे २) श्री गंगाधर बंडू निकम, सेवानिवृत्त वनक्षेत्रपाल संघ, पुणे शाखा धुळे आम्ही वारकरी, धुळे सोबत झाडे लावा झाडे जगवा, पाणी आडवा पाणी जिरवा, स्वच्छता राखा, प्रदूषण टाळा हे बोर्ड वरिल रथा सोबत घेवून पायी निघालो.

म.श्री.व्ही.टी. पत्की साहेब, अध्यक्ष वन कर्मचारी संघ, पुणे, म. संभाजीराव गवळी सो अध्यक्ष-धुळे आणि म. जे. ए. पाटील, सचिव-धुळे यांचे समक्ष भ्रमणध्वनी वरुन संयुक्त विद्यमाने आम्ही निघालो.

दि. २१/०६/२०२४ रोजी राजणगांव येथे ह.भ.प. छल्लारे महाराजांचे प्रवचन, रात्री मुक्काम लांजे-आंबेओहोळ भारुडाचा कार्यक्रम.

दि. २२/०६/२०२४ रोजी बोढरे मार्गे गौताळा औट्रम घाटातून पायी भांबरवाडी येथे पोहोचलो. श्री नारायण नामदेव राठोड यांच्याकडे भजन व हरिपाठाचा कार्यक्रम व मुक्काम.

दि. २३/०६/२०२४ रोजी वाटचालीने तेलवाडी येथे पोहोलो. तेथे श्री. उत्तम वालचंद सभापती, कन्नड यांच्या घरी ह.भ.प छल्लारे महाराजांचे पर्यावरणाबाबत प्रवचन. बाटघालीने कन्नड येथे पोहोचलो. तेथे वरील बोर्डाचा प्रचार करून मुक्काम.

दि २४/०६/२०२४ रोजी वाटचालीने टापरगांव येथे पोहोचलो. तेथे हरिपाठ, प्रवचन करून पर्यावरणाबद्दल माहिती देवून वाटचालीने रात्री गल्ले बोरगाव येथे गेलो. तेथे विठ्ठल मंदिरात हरिपाठ, भजन व पर्यावरण व वसुधरा संरक्षणाबदल प्रवचन केले.

दि. २५/०६/२०२४ रोजी वाटचालीने वेरुळहून परत आलो. मौजे कसाबखेडा येथे श्री. विठ्ठल सखाराम वेताळ यांचे मळयात दुपारी ह.भ.प छल्लारे महाराज यांचे प्रबंधन व प्रदुषणा बदल माहिती. सोबत श्री जी के निकम साहेब यांनी पर्यावरणा विषयी प्रबोधन दिले.

दि. २८/०६/२०१४ रोजी वैरागड फाटा येथे पोचलो. तेथे भजनाचा व हरिपाठाचा कार्यक्रम लिंगायत सिद्धनाथ वडगांव यांचेकडे केला. रात्री गंगापूर येथे विठ्ठल मंदिरात मुक्काम. श्री. जी. के. निकम साहेब हे होते.

दि. २९/०६/२०४ रोजी सकाळी वाटचालीने देवगड येथे पोहोचलो. तेथे टि.व्ही. 9 वर छल्लारे महाराजांची मुलाखत झाली. पुढे वाटचालीने नेवासा येथे जावून मुक्काम. झाडे लावा झाडे जगवा यावर प्रवचन, भजन, हरिपाठ व मुक्काम.

दि. ३०/०१/२०२० रोजी सकाळी नेवासा येथे पोहोचली. तेथे श्री. ह.म.प. जगदगुरु ज्ञानेश्वर माऊली आळंदीकर यांनी गीतेचे संस्कृतचे प्राकृत करून ज्ञानेश्वरी लिहिली तेथील दर्शन, भजन, हरिपाठ व प्रदुषणाचे संतुलन राखणेबद्दल प्रचार केला.

दि. ०१/०७/२०२४ रोजी श्री. शनी शिंगणापूर जावून शनी देवाचे दर्शन घेवून वाटचालीने घोडेगांव येथे येवून शिगवे तुकाई या मंदिरात जावून हरिपाठ, भजन व पर्यावरण संतुलनाचा कार्यक्रम राबवून मुक्काम शिगवे तुकाई या मंदिरात केला.

दि. ०२/०७/२०२४ रोजी जेऊर येथे पोहोचलो तेथे हरिपाठ भजनाचा कार्यक्रम मुक्काम अहमदनगर.

दि. ०३/०७/२०२४ रोजी वाटचालीने वाटेफळ येथे पोहोचलो, तेथे देखील हरिपाठ, भजन झाले. तरीच श्री. जी. के. निकम साहेब यांनी झाडे लावा, झाडे जगवा व पर्यावरणा विषयी प्रबोधन दिले.

दि. ०४/०७/२०२४ रोजी वाटचालीने घोगरगांव येथे पोहोचलो. तेथे हरिपाठ, भजनाचा कार्यक्रम केला

दि. ०५/०७/२०२४ रोजी चाटचालीने मिरजगाव पोहोचलो, तेथे हरिपाठ भजनाचा कार्यक्रम करून पर्यावरण संतुलन राखण्याबाबत प्रवचन केले

दि.०६/०७/२०२४ रोजी पाटेगांव येथे पोहोचली, तेथे हरिपाठ, मंजन, झाडे लावा झाडे जगवा यात्रा प्रचार केला. सोबत श्री. जी. के. निकम साहेब हे देखील होते.

दि ०७/०७/२०२४ रोजी वाटचालीने करमाळ येथे पोहोचलो. श्री. विलास चंद्रकांत क्षिरसागर यांच्याकडे मुक्काम, हरिपाठ, भजन व पर्यावरण संतुलनाचा प्रचार केला.

दि. ०९/०७/२०१४ रोजी मुर्ती येथे गेलो. तेथे महावीर खैरमोडे बाजार पटांगण येथे भजन व हरपाठ करुन मुक्काम.

दि १०/०७/२०२४ रोजी वाटचालीने करकुंभ येथे पोहोचलो तेथे खंडू श्रीरंग परदेशी मंडपवाले यांच्याकडे हरिपाठ प्रवचन व वसुंधरा संतुलनाचा प्रचार करून नामदेव मंदिरात मुकाम. व्यावेळी श्री. जी. के. निकम साहेब हे देखील सोबत होते.

दि. ११/०७/२०२४ रोजी पंढरपुर येथे चंद्रभागा घाट मठ वलठाणकर याच्या मठात मुक्काम

दि १२/०७/२०२४ रोजी उत्तर रात्री २.३० वाजता चंद्रभागेत स्नान करून संत पुडलिक यांच्या आई वडीलाचे दर्शन, संत पुडलिकाचे दर्शन घेवून ३.३० वाजता बारीत नंबर लावला व ९.३० कजना विठ्ठल व रुख्मिणी मातेचे दर्शन घेवून परत मुक्कामाच्या ठिकाणी आलो

सोबत ज्ञानेश्वर माऊली लहान, सोपान माळी (सायगव्हाण), रामदास मांडोळे खडकी, झटपट टेलर मृदांगाचार्य व गायनाचार्य चाहीरागात, मालचंद जाधव- पिंपरखेड, ह.म.प. विरेंद्र महाराज पिंपरखेलेक, भजनी मंडळ, पिंपरखेड यांनी आम्हाला झाडे लावा झाडे जगवा, पर्यावरणाचे संतुलन राखणे माबद्दल या सर्वांनी देखील वेळोवेळी प्रबोधन दिले

१) श्री. बी आर. छल्लारे, सेवक संघ, सदस्य चाळीसगांच
२) श्री जी. के. निकम, सेवक संघ सदस्य, चाळीसगांव

।। जय जय रामकृष्ण हरी ।

***********************

मेळघाटचा बटवा

डॉ. राम गिरी लिखीत मेळघाटचा बटवा वनौषधीवरील विक्रीबद्दल केंद्रीय कार्यकारणीने या पुस्तक विक्रीसंबंधात घेतलेले निर्णय.

१. मूल्य रु.६०/- प्रति प्रत ठेवली आहे
२.२५ मानार्थ प्रति,विनाशुल्क, क्षेत्रसंचालक,मे.व्या.प्र.यांना सुपुर्द करणे.
३.मेळघाटातील कार्यरत क्षेत्रिय वन कर्मचारी यांना विक्री किंमतीत १०% सवलत देणे. (रु.५४ प्रति प्रत).
४. अशीच १०% सवलत वन प्रशिक्षण विद्यालयातील प्रशिक्षणार्थी यांना देणेत येईल.

डॉ. राम गिरी लिखीत मेळघाटचा बटवा वनौषधीवरील पाच पुस्तके पाच वन प्रशिक्षण संस्थेमधील प्रमुखांना दि.१०-७-२०२४ रोजी चंद्रपूरला बैठकीत वाटप केली व प्र शि क्षणार्थींना १० टक्के सूट देणेत येईल त्याबद्दल माहिती दिली.




••◆•• ••◆••

## हृदयस्पर्शी

### विठ्ठल रखुमाई

"काय ग !!!! कालच तुला खडसावून सांगितले, की बंगल्याच्या भिंतीला पण स्पर्श करायचा नाही... "

" तरी तू आज परत आलीस फुलं मागण्यासाठी ? "

ती कळकट मळकट फ्रॉक घातलेली ८-९ वर्षाची मुलगी अंत्यत केविलवाणा चेहरा करून करुणेच्या स्वरात आवाजात कापर भरत बोलली .....

"ताय वंजळभरच पायजेती द्याकी व... तुमच्या झाडाला हायती बी फुलं म्हणून मागत्या. इथं कुठंच येवढी फूलं नायत फकस्त तुमच्याच बंगल्यात हायत. " ती आठ नऊ वर्षांची मुलगी काकुळतीला येऊन अनघा ला तिच्या बंगल्यातील मोगऱ्याची फुले मागत होती.

अनघा - नाही म्हणून सांगितले ना. निघ इथून. असं म्हणून अनघा बंगल्यात गेली.

कुठून कुठून येतात फुलं मागायला. काय फुकट येतात का. असं एकटीच बडबडत होती.

तेवढ्यात तिचा नवरा राघव आला. काय झालं कोणाला बडबडतेस इथे कोणीच दिसतच नाही ?

"अहो गेले आठ दिवस झाले. एक मुलगी मोगऱ्याची फुलं मागायला येतेय. देवाला पाहिजेत म्हणे... एवढीच हौस आहे तर घ्यायची ना विकत. "

राघव - अनघा !!! अग ती फुलं तर मागतेय द्यायचीस ना. तसंही मोगरा किती लगडलाय फुलांनी.

अनघा - अभिमानाने हो... फुलं खूप लागली आहेत, पण त्याच्या मागे माझे किती कष्ट आहेत. अख्ख्या गल्लीत कुणाच्याच बंगल्यात झाडाला एवढी फुलं नाहीत. फक्त माझ्या दारात. आणि खूप निगा राखावी लागते. झाडांची फुकट नाहीत येत. खत, वेळेत कटिंग, पाणी, आणि तुम्हाला माहिती आहे ना.. मी रोज पूजा करताना देवाला भरपूर फुलं वाहते. सगळ्या देवांच्या फोटोंना ताजे हार घातल्याशिवाय पूजा केल्याचं समाधान नाही मिळत.

राघव - अग एक फूल वाहिलं, तरी देवाला पुरेस असतं. दिलीस चार फुलं त्या मुलीला, तर जाणार आहेत देवाच्याच पायाशी. तू वाहिली काय अन् त्या छोट्या मुलीने. देव तर एकच आहे.

अनघा - ओ तुमचं लॉजिक तुमच्या जवळ ठेवा. माझे कष्ट आहेत त्यामागे.

अनघा - एक सांगू !!!! असं दारातून रिकाम्या हाताने पाठवू नये कुणाला... आणि काय फुलं तर मागतेय... तिने कूठे तुला जेवण किंवा पैसे मागितले. आपल्याकडे आहे त्यातलं थोडं द्यायला मनही तेवढं मोठं असावं लागतं. अनघा !!!! तुला समजवायचं काम केलंय... ऐकायच का नाही ते तूच ठरव.

अनघा - बरं !!! उद्या आली मागायला तर देईन चार फुलं... तेही ही तुम्ही सांगता म्हणून..

राघव - बरं पण जरा प्रेमाने दे. रागे नको भरू त्या छोट्या मुलीला!

अनघा - हं !

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी दारात ती मुलगी उभीच. राग आलेला... पण राघवसाठी देते.

अनघा- ये मुली थांब तिथंच देते फुलं. छोट्या पिशवीत पंधरा वीस फुलं तोडून टाकली. तिच्याजवळ जात उद्यापासून यायचं नाही फुलं मागायला !!!!!

ती मुलगी -- अडखळत अडखळत "ताय... ते आठ दिस फुलं पायजेती. देशीला का ? "

अनघा -आठ दिवस रोज !! कशाला ??

"ते कोपऱ्यावर महादेवाचं देऊळ हाय बघा तिथं द्याला. माय ला पायजे व्हती. " तिची नजर खाली पायाकड, चेहऱ्यावर निर्विकार भाव... ती बोलली आवाज खूप लाघवी, हळू. "माय देवाला बोलली हाय, आठ दिस ताजी फुलं पायाशी घालीन. "

अनघा - मनात म्हणजे नवस.

तिला जोरात ओरडत, "देवाला अर्पण करायला मागून फुलं ... घे जा ना विकत.देवळाच्या बाहेर मिळतात पाच दहा रुपयांत. " मुलीचा चेहरा खाडकन उतरला!

"ताय ....ते...पैसं रोज...... एवढं.. "

अनघा - कळलं !! नाही येत ना पैसे. बोलताच कशाला गं मग असं देवाला. आपल्या कुवतीनुसार बोलावं.

ती काहीच न बोलता फुलांची पिशवी घेऊन खाली मान घालून निघून गेली.

अनघाला मात्र आपण जरा जास्तच बोललो ह्याची सल मनाला लागली. उद्या येईल का? नाही येणार बहुतेक किती बोललो ते ही फुलांसाठी. आज ताजी असणारी फूलं नाही तोडली, तर उद्या सुकून कोमेजून तर जाणार आहेत. तिनं खिडकीतून बाहेर पाहिलं.. मोगरा ही थोडा नाराजच दिसला. जावू दे उद्या चं उद्या पाहू. असं म्हणत ती कामाला लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी दारात ही बया उभीच.

अनघाला मनात हुश्श वाटलं. आली बाई आज परत....

"ताय ....... " तिने हाक मारली.

अनघा - हो आले देते फुलं. कुठं राहतेस गं.

ती - गावाच्या बाहेर पडकी साळा हाय तिथ.

अनघा - घरात कोण कोण आहे ??

ती - माय, बा, मोठी बहण, दोन भाव. आज्जी बी हाय पण ती लाम गावी असत्या.

अनघा - बरं बरं. घे फुलं आणि निघ.

ती - जी ताय.

आठ दिवस न चुकता ती मुलगी फुलं न्यायला येत होती. आपण खूप मोठं काम करतोय, दानधर्म वगैरे अनघाच्या चेहऱ्यावर किंचितशी अभिमानाची लकेर उमटली. स्वतःशी हसत अनघा रोज फुकट फुलं दिली देव ही नकळत आपल्यावर खूष असणारच. मी फुलं दिली म्हणून तिच्या आईचा नवस पूर्ण झालाय नाहीतर तिला विकत फुलं घेणं शक्यच नव्हतं एकटीच बोलत होती इतक्यात राघव तिथे आला.

काय एकट्याच गालात हसता...

अनघा - काही नाही रे... राघव ती मुलगी फुलं न्यायला आठ दिवस न चुकता येतं होती, पण आता हया दहा बारा दिवसात कुठे आलीच नाही.

राघव - अगं आता कशाला येईल? तिला आठच दिवस फुलं हवी होती ना ! तसंही तुला तीचं फुलं मागणं आवडतं नव्हतं. अनघा - अरे पण एकदा परत येवून आभार तरी तिने मानायचे माझे. लोकं केलेले उपकार असे विसरतात म्हणून कुणाला काही देवू नये. तू सांगितलेलं ना... म्हणून न चिडचिड करता फुलं दिली आठ दिवस. रोज ....

राघव हसला.

अनघा - काय झालं ??

राघव - काही नाही.

तेवढ्यात बाहेरून हाक आली . "ताय व ताय....!"

हा तर त्या मुलीचा आवाज. दोघंही बाहेर आली तर दारात ती मुलगी उभी.

अनघा - काय आज पण फुलं पाहिजेत का? आधीच सांगते नाही देणार. आज फुलं थोडी कमीच लागली आहेत मला देवपूजेला पाहिजेत.

ती - ...फुलं नको ताय ......ते.... हे..... हे....

हातात मळकट फडकं होतं, त्यात काहीतरी गुंडाळलेले.

अनघा - काय.... .ते..... हे......

ती - ताय !!!! ते मोठी बहण बाळतपणाला आल्या यवस्थित बाळ हु दे म्हणून माय नवस बोलल्याली माहदेवाला. तुम्ही फुलं दिली आयचा नवस पुरा झाला. परवा दिशी मुलगा झाला बहयणीला. यवस्थित हाय सगळं. माझा बा दगड फोडतो आणि मुरत्या बनीवतो. ताय बा नं हे बनीवलं हाय तुमच्यासाठी. तुमचं उपकार .

केवळ खाजगी वितरणासाठी

प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादन - एस. के. गवळी

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६